बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

निगमित संप्रेषण एवं निवेशक संबंध
प्रधान कार्यालय : लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे - 5
टेली -020 :25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495

22-07-2021

# वृत्तपत्रीय निवेदन

## दिनांक 30 जून 2021 रोजी संपलेल्या तिमाहीचे आर्थिक निकाल

## दृष्टिक्षेपात निकाल

- गतवर्षीच्या तुलनेत निव्वल नफ्यात 106% वाढ होऊन तो रु. 208 कोटी इतका झाला.
- गतवर्षीच्या तुलनेत कार्यान्वयन नफ्यात 56% वाढ होऊन तो रु. 1,110 कोटी इतका झाला.
- आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीमध्ये निव्वळ व्याज उत्पन्न गतवर्षीच्या तुलनेत 29% इतके वाढून ते रु. 1,406 कोटी इतके झाले.
- दि. 30/6/2021 रोजी निव्वळ व्याज अंतर दि. 30/6/2020 च्या तुलनेत 2.43% वरून 3.05% झाले.
- चालू व बचत खात्यातील ठेवींमध्ये (CASA) गतवर्षीच्या तुलनेत 22% वाढ झाली.
- गतवर्षीच्या तुलनेत आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीमध्ये एकूण कर्जामध्ये 14% वाढ होऊन ती रु. 1,10,592 कोटी इतकी झाली.

## नफाक्षमता

- गतवर्षीच्या तुलनेत निव्वळ नफ्यामध्ये 106% वाढ. आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीचा निव्वळ नफा रु. 208 कोटी, जो आर्थिक वर्ष 21 च्या पहिल्या तिमाहीत रु. 101 कोटी होता. मागील तिमाहीच्या तुलनेत त्यात 26% वाढ झाली.
- गतवर्षीच्या तुलनेत कार्यान्वयन नफ्यामध्ये 56% वाढ. आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीचा कार्यान्वयन नफा रु. 1,110 कोटी, जो आर्थिक वर्ष 21 च्या पहिल्या तिमाहीत रु. 710 कोटी होता.
- निव्वळ व्याज उत्पन्नात गतवर्षीच्या तुलनेत 29% वाढ. आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीत व्याज निव्वळ उत्पन्न रु. 1,406 कोटी होते जे आर्थिक वर्ष 21 च्या पहिल्या तिमाहीत रु. 1,088 कोटी होते. मागील तिमाहीच्या तुलनेत त्यामध्ये 2% वाढ झाली.
- एकूण उत्पन्न (व्याजाचे निव्वळ उत्पन्न अधिक इतर उत्पन्न) आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीत रु. 2,097 कोटी झाले. आर्थिक वर्ष 21 च्या पहिल्या तिमाहीच्या रु. 1,457 कोटी उत्पन्नाच्या तुलनेत त्यात 44% वाढ झाली. 31/3/2021 रोजी संपलेल्या तिमाहीत हे उत्पन्न रु. 2,618 कोटी होते.

- शुल्क आधारित उत्पन्नामध्ये गतवर्षीच्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत 68% वाढ होऊन आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीमध्ये ते रु. 245 कोटी झाले.
- व्याजाव्यतिरिक्त उत्पन्नामध्ये गतवर्षी पहिल्या तिमाहीच्या तुलनेत 87% वाढ होऊन आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीमध्ये ते रु. 691 कोटी झाले.
- खर्च व उत्पन्न गुणोत्तरात आर्थिक वर्ष 21 च्या पहिल्या तिमाहीच्या 51.25% च्या तुलनेत आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीत 47.05% इतकी सुधारणा झाली. 31/3/2021 रोजी संपलेल्या तिमाहीमध्ये हे गुणोत्तर 41.20% इतके होते.
- मालमत्तेवरील परताव्यामध्ये सुधारणा झाली. आर्थिक वर्ष 0.22 च्या पहिल्या तिमाहीमध्ये 0.41%, आर्थिक वर्ष 21 च्या पहिल्या तिमाहीमध्ये 22% आणि आर्थिक वर्ष 21 च्या चौथ्या तिमाहीमध्ये 0.35% इतका होता.
- भांडवलावरील परताव्यामध्ये देखील सुधारणा झाली. आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीमध्ये 9.91%, आर्थिक वर्ष 21 च्या पहिल्या तिमाहीमध्ये 5.70% आणिं आर्थिक वर्ष 21 च्या चौथ्या तिमाहीमध्ये 8.24% इतका होता.

## मालमत्ता व देणी

- एकूण व्यवसायामध्ये गतवर्षीच्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीत 14% वाढ होऊन तो रु. 2,84,970 कोटी इतका झाला. मागील तिमाहीच्या तुलनेत त्यात 1% वाढ झाली.
- एकूण ठेवींमध्ये गतवर्षीच्या तुलनेत आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीत 14% वाढ झाली व त्या रु. 1,74,378 कोटी इतक्या झाल्या.
- एकूण कर्जांमध्ये गतवर्षीच्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीत 14% वाढ झाली. व ती रु. 1,10,592 कोटी झाली. निव्वळ कर्जे गतवर्षीच्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीत 18% वाढून ती रु. 1,05,909 कोटी इतकी झाली.
- किरकोळ, कृषि व सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग यासंबंधित व्यवसाय गतवर्षीच्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत 16% वाढला. गतवर्षीच्या तुलनेत किरकोळ कर्जे 19% वाढून ती रु. 28,871 कोटी झाली. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची कर्जे आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीत गतवर्षीच्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत 18% वाढून ती. रु. 21,707 कोटी झाली.

## भांडवल पर्याप्तता

- आर्थिक वर्ष 22 च्या पहिल्या तिमाहीसाठी एकूण बेसेल 3 भांडवल पर्याप्तता गुणोत्तर 14.46% व साधारण भांडवल स्तर 1 गुणोत्तर 11%.

- तरलता तरतूद गुणोत्तर 175% असुन ते नियामकांच्या 100% आवश्यकतेपेक्षा पुष्कळ जास्त आहे.
- बँकेने 17 जुलै २०२१ रोजी रु. 403.70 कोटी रुपयांचे साधारण समभाग पारित केले आहेत, जे 30/6/2021 रोजीच्या CRAR मध्ये लक्षात घेतलेले नाहीत.

**संपत्ती गुणवत्ता**

- दि. 30/6/2021 रोजी एकूण थकित कर्जांचे प्रमाण कमी होऊन ते 6.25% झाले. दि. 30/6/2020 रोजी ते 10.93% आणि 31/3/2021 रोजी 7.23% होते.
- दि. 30/6/2021 रोजी निव्वळ थकित कर्जांचे प्रमाणही कमी होऊन ते 2.22% झाले. दि. 30/6/2020 रोजी ते 4.10% आणि 31/3/2021 रोजी 2.48% होते.
- संरक्षक तरतूद गुणोत्तर (प्रोव्हिजन कव्हरेज रेशो) मध्ये दि. 30/6/2021 रोजी सुधारणा होऊन ते 90.70% झाला. दि. 30/6/2020 रोजी ते 85.62% व 31/3/2021 रोजी ते 89.86% होते.
- या तिमाहीमध्ये बँकेने रु. 285 कोटी कोव्हिड 19 तरतूद केली. बँकेकडे व्याजासह एकूण रु. 973 कोटीची कोव्हिड 19 तरतूद आहे.

**नफा क्षमता** (रु. कोटी)

| तपशील | समाप्त तिमाही | | | बदल (%) | |
|---|---|---|---|---|---|
| | जून 20 | मार्च 21 | जून 21 | वर्ष ते वर्ष | तिमाही ते तिमाही |
| एकूण उत्पन्न | 3,265 | 4,333 | 3,795 | 16.22 | (12.43) |
| एकूण खर्च | 2,555 | 2,793 | 2,684 | 5.05 | (3.91) |
| कार्यान्वयन नफा | 710 | 1,540 | 1,110 | 56.39 | (27.88) |
| तरतुदी व आकस्मिकता (कर वगळून) | 609 | 1,063 | 650 | 6.81 | (38.82) |
| करपूर्व नफा | 101 | 477 | 460 | 355.64 | (3.53) |
| कर खर्च | 0 | 312 | 252 | 0.00 | (19.15) |
| निव्वळ नफा | 101 | 165 | 208 | 105.92 | 25.98 |

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

निगमित संप्रेषण एवं निवेशक संबंध
प्रधान कार्यालय : लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे - 5
टेली -020 :25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495

**शीर्ष व्यवसाय** (रु. कोटी)

| तपशील | राशी | | | बदल (%) | |
|---|---|---|---|---|---|
| | जून 20 | मार्च 21 | जून 21 | वर्ष ते वर्ष | तिमाही ते तिमाही |
| एकूण व्यवसाय | 249,608 | 281,659 | 284,970 | 14.17 | 1.18 |
| ठेवी | 152,987 | 174,006 | 174,378 | 13.98 | .21 |
| त्यापैकी CASA | *75,824* | *93,945* | *92,490* | 21.98 | (1.55) |

**क्षमता**

**महत्त्वाची आर्थिक गुणोत्तरे**

| तपशील | संपलेली तिमाही | | |
|---|---|---|---|
| | जून 20 | मार्च 21 | जून 21 |
| कर्जावरील नफ्याचे प्रमाण (%) | 7.69 | 7.47 | 7.58 |
| गुंतवणुकीवरील नफ्याचे प्रमाण (%) | 6.81 | 6.54 | 6.35 |
| निधी वरील नफ्याचे प्रमाण (%) | 6.34 | 6.50 | 6.19 |
| निधीचा खर्च (%) | 3.96 | 3.60 | 3.38 |
| ठेवीचा खर्च (%) | 4.44 | 3.97 | 3.73 |
| एनआयएम (%) | 2.43 | 3.11 | 3.05 |
| कर्ज/खर्च गुणोत्तर (%) | 1.69 | 5.11 | 1.81 |

**ताळेबंद** (रु. कोटी)

| *दायित्वे* | राशी | |
|---|---|---|
| | जून 20 | जून 21 |
| भांडवल | 5,824 | 6,560 |
| गंगाजळी | 5,032 | 5,781 |
| ठेवी | 152,987 | 174,378 |
| कर्ज | 12,768 | 7,662 |
| अन्य दायित्व व तरतुदी | 5,060 | 5,881 |
| एकूण | **181,671** | **200,262** |
| *मालमत्ता* | | |
| भारतीय रिझर्व्ह बँकेकडील रोख व ठेवी | 16,956 | 9,718 |
| इतर बँकांकडील ठेवी व अल्प सूचनेवरील रक्कम | 119 | 48 |
| गुंतवणुकी | 60,729 | 72,294 |
| कर्जे (निव्वळ) | 89,740 | 105,909 |
| स्थिर मालमत्ता | 1,696 | 1,653 |
| इतर मालमत्ता | 12,432 | 10,640 |
| एकूण | **181,671** | **200,262** |

गुंतवणुकदारांसाठी वेगळे सादरीकरण बँकेच्या www.bankofmaharashtra.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे देण्यात येत आहे.

***